# -: जाहीरात :-

जा.क्र.जिमबाविअजळ/जि.परी.अनु.संघ.शिशुगृह कंत्राटी पद.भ/जाहीरात/१४४६ /२०२२-२३ जळगांव दि२६/०७/२०२२.

महिला व बाल विकास विभाग जे.जे.ए-२०१७/प्र.क्र.५३ ( भाग-४ )/का-८, दिनांक ०६ मे २०१८ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलीत शिशुगृह/विशेष दत्तकगृह विना अनुदानित तत्वावर ० ते ०६ वयोगटातील १० प्रवेशीतांसाठी मंजुर झालेले आहे. शासनाने निश्चित केलेले शिशुगृह करीता मंजुर कर्मचारी आखाड्यानुसार व मा. अध्यक्ष, निवड समिती तथा, मा. जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांच्या दि. २४.०६.२०२२ रोजीच्या मंजुर टिपणीनुसार जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघ संचलीत, शिशुगृह/ विशेष दत्तक संस्था, जळगांव येथील खाली रिक्त पदांकरीता जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जाहीरात तपशिल खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | पद | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय मर्यादा | पदाची जबाबदारी | एकुण पदे | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | परिचारीका ( Nurse ) | ANM व बालरोग तज्ञाचा अनुभव (Experience in pediatrice) | १८ ते ३८ | १. मुलांचे आरोग्य आणि पोषण या संदर्भात तांत्रीक सहाय्य/मदत पुरविणे.<br>२. विशेष दत्त्क गृहातील आजारी मुलांची काळजी घेणे. इ. | ०१ | ९,०००/- |
| २. | वैद्यकिय अधिकारी -अर्धवेळ- ( Doctor Part Time) | M.B.B.S. DC.H. ( M.U.H.S)/M.D. Pediatric, Dch ( M.u.h.s) व बालरोग तज्ञ अनुभव ( Experience of Pediatrician ) | २३ ते ३८ | १. बालकांचे MER तयार करणे.<br>२. आजारी बालकांची आरोग्य विषयक काळजी घेणे. व औषधी पुरविणे.<br>३. बालकांच्या वाढीचे ( Monitor Groth of Children) सह नियंत्रण करणे इ. | ०१ | ७,५००/- |
| ३. | आया ( Ayahs ) | १२ वी ० ते ०६ वंयोगटातील बालकांना सांभाळण्याचा बालरोग तज्ञाकडील अनुभव व प्रमाणपत्र. | १८ ते ३८ | १. बालकांची काळजी घेणे.<br>२. फुड मेनुनुसार बालकांना अन्न व औषधी पुरविले जात आहे का याची खात्री करणे.<br>३. बालकांची व बालकांच्या सभोवतालच्या परिसरात स्वच्छता राखणे व काळजी घेणे इ. | ०५ | ६,०००/- |

कृपया मागे पहा...

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | चौकीदार (Chaukidar) | १० वी पास व सेक्युरीटी गार्ड क्षेत्रातील कामाचा अनुभव | १८ ते ३८ | १. शिशुगृहातील बालकांची व शिशुगृहाची देखरेख व सुरक्षा करणे<br>२. शिशुगृहात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींची नियमानुसार नोंदणी करणे. इ. | ०१ | ६,०००/- |
| | | | एकुण | | ०८ | |

**नियम ,अटी व शर्ती :-**

१. सद्ररची पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन ११ महीन्यांकरीता भरण्यात येतील.

२. परिचारीका/वैद्यकिय अधिकारी/आया/चौकीदार या पदांकरीता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर पदवी, M.S.C.I.T, शासन मान्य टंकलेखन व इतर कोर्स साठी मुलाखत साठी गुणांकन देण्यात येईल गुणांकनाचे स्वरुप हे अटीशर्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.

३. सदरचे शिशुगृह हे ० ते ०६ वयोगटातील बालकांसाठी असल्याने सदर शिशुगृहासाठी केवळ महिला उमेदवारास अर्ज करता येईल. पुरुष उमेदवारांनी अर्ज करुन नयेत केल्यास उमेदवारांचा अर्ज अपात्र करण्यात येईल.

४. महिला उमेदवार या जळगांव जिल्हयातील स्थानिक रहीवाशी असाव्यात. बाहेरील जिल्हयातील महिला उमेदवारांनी अर्ज करुन नयेत केल्यास उमेदवारांचे अर्ज अपात्र करण्यात येतील.

५. जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलीत जळगांव या संस्थेतील कंत्राटी पदभरतीसाठी विहीत नमुना अर्ज, अटी शर्ती व जाहीरात Jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येंत आहे,

६. सद्रर भरती प्रक्रियेतील एखादया पदाकरीता उमेदवार उपलब्ध न झाल्यास भरती प्रक्रियेतील अटी व शर्ती शिथील करण्याचे.अधिकार निवड समीतीकडे राखुन ठेवलेले आहेत.

७. भरती प्रक्रियेकरीता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय,आकाशवाणी चौक जवळ ,प्रशासकिंय इमारत,दुसरा मजला जळगांव या ठिकाणी कागदपत्रे तपासणी कामी दिनांक ०४/०८/२०२३ रोजी सकाळी ठिक ०८:३० वाजेपासुन ----------ठिक-११:०० वाजेपर्यत व्यक्तीशः जाहीरातीसोबत दिलेल्या विहीत अर्जासोबत व आवश्यक त्या शैक्षणीक कागदपत्रांसह उपस्थित राहुन मा. जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव या ठिकाणी दिनांक ०४/०६/२०२३ रोजीं ठिक-११:३० वाजता मुलाखतीस उपस्थित रहावे.

८. जाहीरातीमधील तपशीलाबाबत शंका अथवा अडचण असल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जळगांव या कार्यालयाच्या दुरध्वणी क्रमांक ०२५७-२२२८८२८ वर संपर्क साधावा.

( डॉ. वनिता सोनगत)
नियंत्रण अधिकारी निवड समिती,
तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगांव

( संजय चौधरी )
सदस्य सचिव निवड समिती,
तथा मानद सचिव जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना, जळगांव

(अभिजीत राऊत, भा.प्र.से.)
अध्यक्ष निवड समिती,
जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना जळगांव

कृपया मागे पहा...

# अर्जाचा विहित नमुना

**कंत्राटी पदासाठी अर्ज**

| |
|---|
| कार्यालयीन उपयोगासाठी |
| आवक क्र. दिनांक— / /२०२ |

छायाचित्र व स्वाक्षरी

**प्रति,**

मा. अध्यक्ष,

निवड समिती, तथा जिल्हाधिकारी,

जळगाव

**विषय :—** —————————————— या पदासाठी अर्ज.

**संदर्भ :—**

**महोदय,**

मी, ———————————————— या संस्था क्र. ————— संस्थेचे नाव जिल्हा परीविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित, शिशुगृह/विशेष दत्तक संस्था, जळगाव—————————— या पदाकरीता अर्ज करीत असुन माझी खालील प्रमाणे शैक्षणिक व इतर माहिती सादर करीत आहे.

१. उमेदवाराचे पुर्ण नाव (आडनाव प्रथम) :— ——————————

२. सध्याचा पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता :— ——————————

——————————

३. कायमस्वरुपी रहिवास पत्ता :— ——————————

——————————

४. जन्म तारीख :— ——————————

५. ई—मेल :— ——————————

६. संपर्क क्रमांक :— ——————————

७. विवाहित/अविवाहित :— ——————————

८. अवगत असलेली भाषा :— ——————————

९. शैक्षणिक अर्हता :— ——————————

**(सर्व कागदपत्रांचे छायांकीत प्रती जोडाव्यात) -**

| **अ. क्र.** | **शैक्षणिक पात्रता** | **बोर्डाचे/विद्यापिठाचे नाव** | **उतीर्ण वर्ष** | **एकुण गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | पदव्युत्तर पदवी | | | | |
| ५ | एम.एस.सी.आय.टी. | | | | |
| ६ | शासनमान्य मराठी टंकलेखन (३० श.प्र.मी.) | | | | |
| ७ | शासनमान्य इंग्रजी टंकलेखन (४० श.प्र.मी.) | | | | |
| ८ | शासनमान्य इतर अभ्यासक्रम | | | | |

१०. अनुभवाचा तपशिल –

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | पदनाम | कामाचे स्वरुप | अनुभव वर्षामध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

११.उमेदवारावर गुन्हा/न्यायालयीन प्रकरण/शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे काय :– **होय/नाही.**

१२.अर्जासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे

१. ____________________

२. ____________________

३. ____________________

४. ____________________

५. ____________________

६. ____________________

७. ____________________

८. ____________________

____________________

**(उमेदवाराचे नाव व सही)**

**दिनांक :– / /२०२**

**ठिकाण:**____________

# प्रमाणपत्र

मी,श्री./श्रीमती/सौ/कुमारी---------------------------------------------------प्रमाणित करीता/करीतेकी, वर नमुद केलेला तपशील माझया माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. वर नमुद माहिती ही खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणा–या इतर कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच सदर पदावर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी मी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

______________________

(उमेदवाराचे नाव व सही)

**दिनांक :– / /२०२**
**ठिकाण:**______________

---

## लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्राचा नमुना

मी,श्री./श्रीमती/सौ/कुमारी---------------------------------------------------
श्री. ------------------------------यांचा मुलगा/मुलगी वय----------वर्ष----------
रहाणार------------------------------------------------द्वारे जाहीर करतो/करते की,

१. मी जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित, शिशुगृह/विशेष दत्तक संस्था येथे ----------------------------या पदासाठी अर्ज करीत आहे.

२. आज रोजी मला ------------ इतकी, हयात मुले आहेत त्यापैकी मला दि. २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची/अपत्त्याची संख्या----------मुलगा-----मुलगी-------- आहे. व हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर नियमानुसार सदर पदासाठी मला अपात्र ठरविल्यास माझी कोणतीही हरकत रहाणार नाही याची मला पुर्णत: जाणीव आहे.

______________________

(उमेदवाराचे नाव व सही)

**दिनांक :– / /२०२**
**ठिकाण:**______________

**जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित शिशुगृहातील परिचारीका, वैद्यकिय अधिकारी, आया आणि चौकीदार या कंत्राटी पदांकरीता अटी व शर्ती**

१. उमेदवार यांनी एकाचा पदासाठी अर्ज करावा. एकापेक्षा जास्त पदासांठी अर्ज केल्यास दोन्ही अर्ज अपात्र ठरविण्यात येतील तसेच अर्जामध्ये पदाचा स्पष्ठ उल्लेख करावा.

२. जाहीरातीमध्ये नमुद पदासाठी निश्चित करण्यात आलेल्या शैक्षणीक पात्राता धारक करणाऱ्या उमेदवारास गुणांकण इ १० व १२, पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.एस.सी.आय.टी, टंकलेखन इत्यादी अनुभवानुसार देण्यात येतील. गुणांकनाचे स्परुप अटी व शर्तीमध्ये खाली नमुद करण्यात आलेले आहे.

३. उमेदवारांचे अर्जाची छाननी करण्यात येऊन पात्र उमेदवारांनी निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखत ही ०५ गुणांची असेल. शैक्षणिक पात्रता , अनुभव , इतर कोर्स व मुलाखत यामध्ये सर्वाधिक गुण प्राप्त उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल व १:२ अशी प्रतिक्षा यादी गुणानुक्रमानुसार ठेवण्यात येईल

४. शैक्षणिक पात्रता, अनुभव व इतर कोर्स यासाठीच्या गुणांकनाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता , टक्केवारी व इतर | गुण |
|---|---|---|
| | इ. १० वी उत्तीर्ण | -- |
| | ७५ व त्यापुढील | ०५ |
| | ६० ते ७४.९ | ०४ |
| | ५० ते ५९.९ | ०३ |
| | ३५ ते ४९.९ | ०२ |
| | **इ. १२ वी उत्तीण** | -- |
| | ७५ व त्यापुढील | ०५ |
| | ६० ते ७४.९ | ०४ |
| | ५० ते ५९.९ | ०३ |
| | ३५ ते ४९.९ | ०२ |
| | **पदवी उत्तीर्ण** | |
| | ७५ व त्यापुढील | ०५ |
| | ६० ते ७४.९ | ०४ |
| | ५० ते ५९.९ | ०३ |
| | ३५ ते ४९.९ | ०२ |
| | **पंदव्युत्तर उत्तीर्ण** | |
| | ७५ व त्यापुढील | ०५ |
| | ६० ते ७४.९ | ०४ |
| | ५० ते ५९.९ | ०३ |
| | ३५ ते ४९.९ | ०२ |
| | **अनुभव** | |
| | **शासकिय / निमशासकिय ( ०३ वर्षे व त्यापुढील )** | ०४ |
| | **शासकिय / निमशासकिय ( ०२ वर्षे व त्यापुढील )** | ०३ |
| | **शासकिय / निमशासकिय ( ०१ वर्षे व त्यापुढील )** | ०२ |
| | **खाजगी ( ०२ वर्षे व त्यापुढील )** | ०२ |
| | **खाजगी ( ०१ वर्षे व त्यापुढील )** | ०२ |
| | **इतर** | **०१** |
| | एम.एस.सी.आय.टी | ०१ |
| | शासन मान्य मराठी टंकलेखन ४० शब्द प्र.मि. | ०१ |
| | शासन मान्य इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्र.मि. | ०१ |
| | इतर कोर्स ( शासन मान्य कोर्स १ वर्ष व त्यावरील | ०२ |

कृपया मागे पहा

५. सदर पदे ही पुर्णतः अस्थायी व कंत्राटी स्वरुपाची असुन संस्थेने जाहीरातीमध्ये निश्चित केलेले मानधन हे देय राहील.

६. सदर पदावरील नियुक्ती ही ११ महीन्यांकरीता कंत्राटी स्वरुपाची असुन समाधानकारक कामाच्या मुल्यांकनानुसार प्रथम ०३ वर्षे व पुढील कामकाज समाधानकारक असल्यास ०२ वर्ष मुदतवाढ असे एकुण ०५ वर्षासाठी नियुक्त राहील व प्रत्येक ११ महीन्या नंतर ०१ दिवसाचा खंड देऊन मुदतवाढ देणेबाबतचा निर्णय मा. अध्यक्ष, निवड समिती तथा जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मान्यतेने घेण्यात येईल तसेच असमाधानकारक कामाचे मुल्यांकन असल्यास कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

७. उमेदवारास १५ दिवसाचे आत नियुक्तीच्या ठिकाणी कामावर हजर व्हावे लागेल. सदर उमेदवार विहीत कालावधीत कामावर हजर झाले नाही तर, विहीत कालावधीनंतर प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांचा त्या-त्या पदासाठी नियुक्तीचा विचार करण्यात येईल. ०१ उमेदवार निवड करावयाचा असल्यास ०२ उमेदवार या प्रमाणे उमेदवारांची प्रतिक्षा यादी असेल व प्रतिक्षायादी १ वर्षा पर्यंत ग्राहय धरण्यात येईल.

८. अंतीम निवड झालेले उमेदवार यांस जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना कडून मार्गदर्शक सुचना, महीला व बाल विकास विभागाचे प्रचलित नियम व अधिनियम, सामाजिक अधिनियम, शासन निर्णय, जिल्हाधिकारी यांचे आदेश / व निर्देश, विरिष्ठ कार्यालयाचे सुचना इ निर्देशान्वये काम करावे लागेल. तसे न केलयास कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल व न्यायालयात या संदर्भात दाद मागता येणार नाही.

९. निवड झालेल्या उमेदवारांना शासकिय कर्मचाऱ्यांना देय असलेले कोणतेही भत्ते व सोयी सुविधा देय असणार नाहीत. व भविष्यात सेवेत कायम करण्यासाठी कोणतेही मागणी करणार नाही व त्याबाबतचे न्यायालयात निवेदन देणार नाही असे हमीपत्र/करारपत्र या कार्यालयास लिहुन द्यावे लागेल.

१०. निवड झालेल्या उमेदवाराचे चारित्र्य पडताळणी अहवाल पोलीस विभागाकडुन मागविण्यात येईल. त्याबाबत मागुन काही खुलासा झाल्यास किंवा तसा गुन्हा नोंद आढळल्यास उमेदवारांची कंत्राटी सेवा नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

११. उमेदवारांची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणत्याही क्षणी आपणांस पुर्व सुचना न देता कामावरुन कमी करण्याचे अधिकारी निवड समिती यांचेकडे राखुन ठेवत आहे.

१२. निवड झालेल्या उमेदवारास कार्यालयीन गोपनीय बाबीबद्दल बाहेर वाच्यता करता येणार नाही व भारतीय घटनेशी एकनिष्ठ राहण्याची आपणांस प्रतिज्ञा करावी लागेल.

१३. निवड झालेल्या उमेदवारास सेवा सोडवायची असल्यास एक महिना अगोदर कार्यालयास लेखी सुचना द्यावी लागेल. अथवा एक महीन्यांचे मानधन कार्यालयास द्यावे लागेल.

१४. विशेष दत्तकगृहाचे कामकाज हे अत्यावश्यक सेवेत येत असल्यामुळे नियुक्त कर्मचाऱ्यास सर्व जिल्हयात,राज्यात,देशात प्रवास करावा लागेल.

१५. सदर संस्था ही निवासी असल्याने २४X७ सेवा देणे बंधकारक राहील.

१६. निवड झालेल्या उमेदवाराच्या ताब्यात असलेल्या कार्यालयीन मालमत्तेची योग्य ती काळजी घ्यावी लागेल. सदर मालमत्तेचे नुकसान झाल्यास आपल्या मानधनातुन नुकसान भरपाई करुन घेण्यात येईल.

१७. परिचारीका या कंत्राटी पदासाठी ANM व बालरोग तज्ञाचा अनुभव याखेरीज १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर पदवी, M.S.C.I.T, शासन मान्य टंकलेखन अनुभव ( Experience in pediatriece) इ. साठी गुणांकण देण्यात येईल.

१८. वैद्यकिय अधिकारी (अर्धवेळ ) या कंत्राटी पदसाठी M.B.B.S. DC.H. ( M.U.H.S)/M.D. Pediatric, Dch ( M.u.h.s) ही शैक्षणीक पात्रता राहील.

१९. आया या कंत्राटी पदासाठी इ १२ वी उत्तीर्ण ही शेक्षणीक पात्रता राहील. या खेरीज इ.१२ , बालरोग तज्ञ यांच्या दवाखान्यातील ० ते ०६ वयोगटातील लहान मुले सांभाळण्यातचा अनुभव इत्यादी साठी गुणांकन देण्यात येईल.

२०. चौकीदार या कंत्राटी पदासाठी शैक्षणीक पात्रता १० वी पास ही राहील याखेरीज इ.१२, पदवी,पदव्युत्तर, M.S.C.I.T,शासन मान्य टंकलेखन,चौकीदार क्षेत्राचा अनुभव इ. साठी गुणांकण देण्यात येईल.

२१. जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस उमेदवारांचे वय किमान १८ व कमाल ३८ असावे. M.B.B.S.डॉक्टरांचे वय किमान २३ व कमाल ३८ असे राहील.

कृपया मागे पहा

२२. उमेदवार यांना शासकिय/निमशासकिय/खाजगी कामाचा अनुभव असल्यास अनुभवाचा दाखल आदेश सादर करावा.

२३. उमेदवार हा जळगांव जिल्हयातील स्थानीक रहीवासी असावा. बाहेरील उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात येतील.उमेदवार यांनी जळगांव जिल्हयातील स्थानीक राहीवासी म्हणुन सक्षम प्रधिकारी यांनी दिलेला स्थानीक रहीवासी दाखला आधार कार्ड, मतदान ओळखपत्र इ. पुरावा ग्राहय धरण्यात येतील. तसेच तो सादर करावा लागेल.

२४. उमेदवार यांनी सर्व प्रमाणपत्रे सक्षम प्रधिकारी यानी सांक्षाकित केलेले किंवा स्वय सांक्षाकित केलेल्या छायांकीत प्रती सादर कराव्यात.

२५. विवाहीत महीला उमेदवारांनी दोन्ही नावासंह अर्ज करतांना नावात बदले झाल्याबाबतचा पुरावा जोडावा ( उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र, लग्नपत्रीका,प्रतिज्ञापत्र,राजपत्र).

२६. सदर पदासाठी विहीत नमुण्यातील लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

२७. दिनांक ४ जानेवरी २०२१ च्या शासन निर्णय क्रं.अनाथ-२०२०/प्र.क्र.९१/का-०३ नुसार अनाथांना प्राधान्य देण्यात येईल.

२८. प्रत्येकी १ शैक्षणीक अभ्यास क्रमासाठी गुणदान करण्यात येईल.

२९. निवड झालेल्याउमेदवारास शासकिय वैदकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३०. निवड झालेल्या उमेदवारांस सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचा १०० रुपये स्टॅम्प पेपरवर करारपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३१. जाहीरातीमध्ये नमुद पदांच्या जबाबदारी नुसार निवड झालेल्या उमेदवारास काम करावे लागेल.

३२. जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित जळगांव या संघटनेतील कंत्राटी या पदासाटी जाहीरात, अटी शर्ती, व अर्जाचा नमुनाjalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी अधिक माहितीसाठी सदर संकेतस्थळाला भेट देणे.

३३. जाहीरातीमधील तपशीलाबाबत शंका अथवा अडचण असल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जळगांव या कार्यालयाच्या दुरध्वणी क्रमांक ०२५७-२२२८८२८ वर संपर्क साधावा.

**( डॉ. वनिता सोनगत)**
नियंत्रण अधिकारी निवड समिती,
तथा जिल्हा महिला व बाल विकास
अधिकारी, जळगांव

**( संजय चौधरी )**
सदस्य सचिव निवड समिती,
तथा मानद सचिव जिल्हा परिविक्षा आणि
अनुरक्षण संघटना, जळगांव

**(अभिजीत राऊत, भा.प्र.से.)**
अध्यक्ष निवड समिती,
जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना
जळगांव